# मनाला फुलवणारे पु.ल. : एक अभिवादन - जयंत नारळीकर


बारा जून, २०००... भाई गेले तेव्हा सर्वसाधारण मराठी भाषिकाला जाणवले की 'आपला जवळचा माणूस गेला.' आपल्या असामान्यत्वामुळे जनसामान्यांचा आदर मिळवणारे अनेक असतात, पण आदराबरोबर आपुलकी मिळवणारा क्वचितच सापडतो. पुलंच्या विविधरंगी व्यक्तिमत्त्वाचे हे वैशिष्ट्य होते. हे व्यक्तिमत्त्व माझ्या जीवनात आले त्याला जवळजवळ पाच दशके उलटली. 'कालाय तस्मै नमः' म्हणत आयुष्य पुढे सरकत असले तरी त्या हिरव्यागार आठवणी कालावर मात करून ठळकपणे टिकून आहेत...

•••

१९५१-५४ दरम्यानची आठवण. मी शाळेत होतो. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या आवारात आमचे घर होते. घरी कोणी प्रसिद्ध, उल्लेखनीय व्यक्ती आल्या की आम्हा दोघा भावांना त्यांना भेटायला, नमस्कार करायला बोलावण्यात येई. या वेळी पण तसेच बोलावण्यात आले हे आठवते आणि त्या पाहुण्यांचे विनोदी व्यक्तिमत्त्व.

त्या दिवशी युनिव्हर्सिटीच्या म्युझिक ॲण्ड फाइन आर्ट्स कॉलेजमध्ये एक लहानसा कार्यक्रम झाला. विनोदी संभाषण करणारा हा माणूस उत्तम पेटी वाजवतो (आणि तेही एका हाताने) हे त्या वेळी कळले आणि परखड बोलणाऱ्या पं. ओंकारनाथ ठाकुरांचे प्रशंसोद्गार ऐकून या माणसात 'काही तरी विशेष' आहे असे वाटले.

आणि त्या वैशिष्ट्याची आणखी एक झलक पाहायला मिळाली. काही वर्षांनी 'गुळाचा गणपती' सिनेमात. महाराष्ट्रात गाजलेले काही मराठी सिनेमे क्वचितप्रसंगी एखाद्या रविवारी खास 'सकाळच्या शो'मध्ये दाखवण्यात येत. 'तोच पेटी वाजवणारा, विनोदी सिनेनट पण आहे हे तेव्हा कळले...'



•••

त्यानंतर पुलंची भेट झाली अचानकपणे अनपेक्षित ठिकाणी. १९५८ मध्ये इंग्लंडमध्ये विद्यार्थी म्हणून असताना मी आणि माझे सहाध्यायी शशिकुमार चित्रे ब्रिटिश काउन्सिलतर्फे आयोजित सुट्टीतील प्रकल्पातून एडिनबरा येथील संगीत-नाट्य महोत्सव पाहायला गेलो होतो. पाश्चात्य संगीताचे तसेच नाट्यप्रकारांचे विविध आविष्कार आम्हाला पाहायला मिळाले... शेक्सपिअरकालीन थिएटर, रशियन बॅले, यहुदी मेनुहिनचे व्हायोलिनवादन इत्यादी.

याप्रसंगी दुपारी प्रिन्सेस स्ट्रीटवर अथांग जनसागरात मी आणि कुमार चित्रे फिरत असताना, 'यथा काष्ठं च काष्ठं च' न्यायाने आमच्यासमोर आले देशपांडे दाम्पत्य! नमस्कार- चमत्कार झाल्यावर पुलंनी आठवण दिली त्यांच्या बनारस भेटीची. 'त्या दिवशी पोहे छान झाले होते' ही त्यांच्यातल्या खाद्यरसिकाची दाद होती. 'आम्हाला पोहे करता येत नाहीत पण आपल्या कार्यक्रमात केंब्रिज दाखवण्याची संधी द्या' अशी आम्ही त्यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. काष्ठं च काष्ठं च पुन्हा एकत्र येणार होती.

•••

काही आठवड्यांनी ती संधी आम्हाला मिळाली. पु.ल. आणि सुनीताबाईंना केंब्रिज विद्यापीठ फिरून दाखवले तो दिवस आजही डोळ्यांसमोर आहे. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी आठवड्याला घरी लिहिलेल्या पत्रात त्या भेटीचे वर्णन केले होते. पुढे त्याच भेटीचे वर्णन 'अपूर्वाई'त वाचायला मिळाले आणि रोखठोक गणिती भाषेतला वृत्तांत आणि रंजक भाषेत विनोदी लेखकाच्या सिद्धहस्त शैलीतला वृत्तांत यात किती फरक असू शकतो ते जाणवले.

पुलंच्या लेखनशैलीचे पहिले दर्शन मला त्या दिवशी संध्याकाळी झाले. कुमार चित्रे यांच्या खोलीत (पोहे नसलेला!) ब्रिटिश आफ्टरनून टी घेतल्यावर पुलंनी 'बटाट्याच्या चाळीतल्या' शेवटच्या 'चिंतना'चे वाचन केले. आणि विनोदी बोलणारा, पेटी वाजवणारा उत्कृष्ट सिनेनट हा वाचकाच्या मनाची पकड घेणारा लेखकही आहे हे तेव्हा कळले.

•••

पुलंच्या अनेक प्रतिभांपैकी नाट्यकलेचे प्रथम दर्शन झाले ते १९६५ मध्ये जेव्हा मी भारतात व्याख्यान दौऱ्यावर आलो होतो. त्या वेळी वास्तव्य केंब्रिजमध्येच होते. पण भारतयात्रेत आल्यावर नाटकं पाहायची संधी सोडत नसे. अर्थातच त्या वेळी गाजत असलेली 'वाऱ्यावरची वरात' माझ्या 'शॉर्टलिस्ट'वर होतीच.

मुंबईत बिर्ला मातुश्री सभागृहातला तो 'सकाळचा शो'अजून आठवतो. एका दशकापूर्वी सिनेमाच्या पडद्यावर पाहिलेला नट अशाच एका सकाळी प्रत्यक्ष स्टेजवर दिसत होता. मी प्रेक्षकांत बसलेलो आहे ही बातमी पुलंना त्यांच्या हेरांनी पोचवली होती, कारण त्यांनी निरोप पाठवून दोन अंकांदरम्यान स्टेजमागे बोलावले. त्या वेळी केंब्रिज भेटीची आठवण निघाली.

हा हरहुन्नरी माणूस त्यानंतर वेळोवेळी माझ्या जीवनात येत गेला आणि प्रत्येक वेळा माझ्या सुखद स्मृतीत भर पडत गेली. म्हणून अनेकांप्रमाणे मलाही जाणवते की आपला जवळचा माणूस दूर गेला. पण त्याने मागे ठेवलेला साहित्य - संगीत - कलेचा खजिना आपल्याला आयुष्यभर साथ करणार याचे समाधान आहे.

•••